फौ.खटला क्र:५३९९/२०२३

मे.डीएसए स्पिरीट वि हॉटेल सुरभी

नि.क्र.५४

**<u>आरोपीचा ३१३ सी.आर.पी.सी प्रमाणे खालील जबाब.</u>**

आरोपीचे नांव —**हॉटेल सुरभी परमिट रूम ॲण्ड बिअर बारचे प्रोप्रायटर ओमप्रकाश चुनीलाल कालडा,**

वय—५० वर्ष, धंदा— व्यापार,

राहणार— गट नं.२२८८, नेहरू चौक, तेलीखुंट, गुरूनानक मार्केट, मु.पो, ता. संगमनेर, जि. अहमदनगर.

| | |
|---|---|
| प्रश्न १: | फिर्यादीतर्फे घेण्यात आलेला पूरावा तूम्ही ऐकला का व तो तुम्हाला समजला का? |
| उत्तर : | होय. |
| प्रश्न २: | फिर्यादी साक्षीदार क्र.१ शहबाज इलियास इनामदार यांचे पुराव्यात असे आले आहे की, फिर्यादी यांचा मे.डीएसए स्पिरीट या नावाने लेवल नं.३, रिरोन्सी टॉवर, नगर मनमाड रोड, ऑक्झीलीयम हायस्कुल जवळ, सावेडी रोड, अहमदनगर येथे विदेशी दारू व बिअर ठोक स्वरूपात विक्री करण्याचा व्यवसाय आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर : | होय. |
| प्रश्न ३: | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, फिर्यादी कंपनीने प्रोप्रा. संजय विनोदकुमार अगरवाल यांनी कंपनीच्या वतीने नोटीस देणे, फिर्याद दाखल करणे, त्यावर सहया करणे, वकील नेमणे, वकीलपत्रावर सहया करणे, जबाब देणे, पुरावा देणे, अपसात तडजोड करणे व त्या अनुषंगाने सर्व ती कोर्ट कारवाई करण्याबाबत दिनांक ११.०८.२०२३ रोजी त्यांना जनरल मुखत्यारपत्र दिलेले आहे. फिर्यादी फर्मकरिता मुखत्यार या नात्याने त्यांनी फिर्याद दाखल केली आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर : | माहित नाही. |
| प्रश्न ४: | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, फिर्यादी हे सदर फर्ममध्ये मॅनेजर म्हणुन नोकरी करतात व त्यांना सदर फर्मचे कामकाजाची माहिती आहे. करिता त्यांनी सदर फिर्याद दाखल केली आहे. मुखत्यारपत्र नोटरी पब्लीक यांचेसमोर नोंदविलेले असुन त्यावर त्यांच्यादेखील सहया व शिक्के आहेत. याबाबत तुम्हास काय सांगावयाचे आहे? |

| | |
|---|---|
| उत्तर : | हे खोटे आहे. |
| प्रश्न ५: | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, फिर्यादी हे सदर व्यवसायाचे मालक आहेत. त्यांच्याकडे विदेशी दारू, बिअर विक्रीचा रितसर परवाना आहे. फिर्यादी हे त्यांचे व्यवसायाचे माध्यमातुन वेगवेगळे विदेशी दारूचे दुकान परमिट रूम बिअरबार यांना त्यांचे मागणीनुसार विदेशी दारूची तसेच बिअरची विक्री करतात. फिर्यादीला मिळालेल्या ऑर्डरप्रमाणे माल पाठवितात. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर : | हे खोटे आहे. |
| प्रश्न ६: | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तुमचे ता.संगमनेर, जि. अहमदनगर येथे हॉटेल सुरभी परमिट रूम ॲण्ड बिअरबार या नावाने व्यवसाय असुन तुम्ही त्याचे मालक आहेत. तुम्हाला सदर व्यवसायाचा रितसर परवाना मिळालेला आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर : | हे बरोबर आहे. |
| प्रश्न ७: | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तुम्ही तुमचे दुकानात किरकोळ विक्रीसाठी विदेशी दारू, बिअर या मालाची आवश्यकता असल्याने तुम्ही फिर्यादीचे दुकानातुन विदेशी दारू, बिअर इत्यादी अनेक वर्षापासुन खरेदी करत आलेले आहेत. त्यामुळे फिर्यादी व तुमच्यामध्ये व्यावसायीक विश्वासाचे, भरवशाचे असे संबंध निर्माण झालेले असुन तुम्ही फिर्यादीचा विश्वास संपादन केलेला आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर : | खरे आहे. परंतु विश्वास संपादन केला असा प्रकार नाही. |
| प्रश्न ८: | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तुमचे फिर्यादीचे फर्मकडे उधारीचे खाते असुन दिनांक ०१.०४.२०२२ ते १८.०७.२०२३ पर्यंत एकुण रक्कम रूपये ६,९७,४५९/— इतक्या मालाची उचल केलेली आहे. फिर्यादी यांनी तुमचे खाते ठेवले असुन तूमच्या खात्याचा संगणकीकृत उतारा ६५ बचे प्रमाणपत्रासह दाखल केलेला आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर : | हे खोटे आहे. |
| प्रश्न ९: | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तुम्ही सदर उधारीने घ ेतलेल्या मालाची रक्कम वेळेत आणुन देण्याचे मान्य केलेले असुन वेळेत रक्कम न दिल्यास व थकबाकी झाल्यास त्या रकमेवर नुकसान म्हणुन व्याज आकारले जाईल याची देखील तुम्हाला जाणीव करून दिलेली आहे. |

| | |
|---|---|
| | फिर्यादी यांना तुमच्याकडुन थकबाकीपोटी रक्कम रूपये ६,२७,९२८/— येणे बाकी आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर : | हे खोटे आहे. |
| प्रश्न १०: | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, सदर थकबाकीची फिर्यादीने वारंवार मागणी करूनदेखील सदर परतफेड तुम्ही मुदतीत केली नाही व बाकी थकविली म्हणुन सदर फिर्यादीने तुमच्याकडे लेखी व तोंडी स्वरुपात थकबाकी रक्कमेची मागणी केली असता तुम्ही दिनांक १४/०७/२०२३ रोजी रक्कम रुपये ६,२७,९२८/— दि.संगमनेर मर्चन्टस को ऑप बॅक लि., शाखा बाजारपेठ, संगमनेर, ता.संगमनेर, जि. अहमदनर या बॅकेचा धनादेश क्र. ३५६५२५ फिर्यादीस दिला, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर : | हे खोटे आहे. |
| प्रश्न ११: | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, सदरचा धनादेश फिर्यादीने त्यांचे खाते असलेल्या बॅकेत अहमदनगर मर्चंटस को ऑप बॅक लि., शाखा गुलमोहर रोड, अहमदनगर येथे दिनांक १५.०७.२०२३ रोजी भरला असता तो '**Exceed Arrangement**' असा शेरा असलेला मेमोसह दिनांक १७/०७/२०२३ रोजीचा परत पाठविला, याबाबत तुम्हास काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर: | हे खोटे आहे. |
| प्रश्नः १२ | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, फिर्यादीने तुम्हाला दिनांक २२/०७/२०२३ रोजी वकिलां मार्फत नोटीस पाठवुन चेकच्या रक्कमेची मागणी केली, सदर नोटीस तुम्हाला दिनांक २५/०७/२०२३ रोजी प्राप्त झाली, तरी देखील तुम्ही मुदतीत पैसे परत दिले नाहीत करीता फिर्यादीने तुमचे विरुध्द सदरची केस निगोशिएबल इंस्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ अन्वये दाखल केली, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर : | हे खोटे आहे. |
| प्रश्न :१३ | फिर्यादी शहबाज इलियास इनामदार तुमच्या विरूध्द का सांगतात? |
| उत्तर : | त्यांच्याशी आमचा काही संबंध नाही. |
| प्रश्न :१४ | नि.क्र.१५ वरील धनादेशाबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | धनादेश सिक्युरीटी करता दिला होता. |
| प्रश्न :१५ | नि.क्र.१६ वरील रिटर्न मेमोबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | नाही. |

| | |
|---|---|
| प्रश्न :१६ | नि.क्र.१७ वरील नोटीसबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | नोटीस खोटी आहे. |
| प्रश्न :१७ | नि.क्र.१८ वरील पोस्टाच्या पोहोच पावतीबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | नाही. |
| प्रश्न :१८ | नि.क्र.१९ वरील जनरल मुखत्यारपत्राबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खोटे आहे. |
| प्रश्न :१९ | नि.क्र.२० वरील खातेउता—याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खोटे आहे. |
| प्रश्न :२० | नि.क्र.२१ वरील भारतीय पुरावा कायदा कलम ६५—ब चे प्रमाणपत्राबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खोटे आहे. |
| प्रश्न :२१ | तुम्हाला स्वत:ला शपथेवर तपासायचे आहे काय किंवा अन्य साक्षीदार तपासायचे आहेत काय? |
| उत्तर : | होय. |
| प्रश्न :२२ | तुम्हाला बचावाखातर काही कागदपत्र दाखल करावयाचे आहेत काय? |
| उत्तर : | होय. |
| प्रश्न :२३ | प्रकरणाबाबत आणखी काही सांगावयाचे आहे का? |
| उत्तर : | खोटी केस दाखल केली आहे. |

समक्ष.

.............................

सही/—

**(माधुरी रा. खनवे)**

आरोपीची सही/आंगठा

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र.०७, अहदमनगर

<u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, आरोपीचा उपरोक्त जबाब माझ्या समक्ष नोंदविण्यात आला असून तो त्याने सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे.

सही/—

**(माधुरी रा. खनवे)**

दिनांक :१०/०७/२०२५

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र.०७, अहदमनगर